नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

# प्रेस नोट

दिनांक 29/04/2021 (गुरूवार)
(सकाळ)

---

## चोरी

पो.स्टे. खापरखेडा :- अंतर्गत 10 कि.मी. अंतरावर दहेगाव येथे दि. 23/04/2021 चे 08.00 ते 09.00 वा. दरम्यान फिर्यादी नामे- विनोद चंद्रभान भोयर, वय 43 वर्षे, रा. वार्ड क्र 4, दहेगांव रंगारी हा दारू पिण्यासाठी कुचक मोहल्ला येथे गेला तेथुन परत आल्यावर त्याला त्याची एमएच- 40/ऐवाय- 9091 क्रमांकाची मोपेड गाडी दिसली नाही. त्यादरम्यान अज्ञात आरोपीने फिर्यादींची किंमती 15,000 /-रू. ची गाडी चोरून नेली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. खापरखेडा येथे आरोपीविरुध्द कलम 379 भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोलिस हवालदार उमेश ठाकरे मो नं. 9823453169 हे करीत आहे.

## गळफास लावून मृत्यु

1) पो.स्टे. खापरखेडा :- अंतर्गत 06 कि.मी अंतरावर चनकापुर वार्ड क्र 06 हनुमान मंदीर जवळ येथे दिनांक 28/04/2021 चे 12:30 वा. ते 02.00 वा. दरम्यान फिर्यादी नामे- शांता सुरेश बेहार, वय 40 वर्षे, रा. चनकापुर वार्ड क्र 06, हनुमान मंदीर जवळ यांचा लहान मुलगा नामे- जय उर्फ छोटु सुरेश बेहार (मृतक) वय 19 वर्षे, रा. चनकापुर वार्ड क्र 06, हनुमान मंदीर जवळ हे दोघेही सोबत राहत होते व गावात जवळच राहणारे मोठी मुलगी व मोठे बाबा यांचे कडे गेले होते. दि 27/04/2021 रोजी रात्री 10.30 वा. सुमरास फिर्यादी यांनी आपले मुलाला जेवन करीता फोन केले असता तो 11.00 वा. तो आला व त्यावेळी तो दारूच्या नशेत होता. घरी येवुन तो जेवन करून फिर्यादीला काहीही न सांगता तो घरून निघुन गेला. रात्री फिर्यादी दि. 28/04/2021 चे 02.00 वा. दरम्यान फिर्यादी झोपेतुन उठली असता तिला मुलगा घरी दिसुन आला नाही. तेव्हा फिर्यादी हिने इकडे तिकडे शोध घेतला असता दिसुन आला नाही. जय बेहार हा दारू पिण्याचा सवयीचा असून त्या दिवशी तो दारू पिवुनच होता. फिर्यादी यांच्या घरासमोर नर्सरी आहे जय बेहार याने सिसमच्या झाडाखाली फिर्यादीच्या मुलाने गळफास घेतल्यानंतर तो मृत अवस्थेत आढळून आला.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरुन पो.स्टे. खापरखेडा येथे कलम 174 जाफौ. कायद्यान्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास पोहवा सुर्यभान जळते 9673837007 हे करीत आहे.

2) पो.स्टे. बेला :- अंतर्गत 32 कि.मी अंतरावर मौजा चिखलापार शिवार येथे दिनांक 28/04/2021 चे 15:00 वा. पुर्वी पासुन फिर्यादी नामे- लहानु कवडु ढोणे, वय 65 वर्ष, रा.चीखलापार त. भिवापुर, जि. नागपुर यांचा मुलगा नामे- नारायण लहानु ढोणे(मृतक), वय 48 वर्ष, रा. चिखलापार त.भिवापुर, जि.नागपुर याने चिखलापार शिवारातील नांद नदीच्या थडीवरील पळसाचे झाडाचे फांदीला अज्ञात कारणावरून नायलॉनच्या दोरीने गळफास घेतल्यानंतर तो मृत अवस्थेत आढळून आला.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरुन पो.स्टे. बेला येथे कलम 174 जाफौ. कायद्यान्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास पोहवा अशोक जाधव 7774805928 हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर